IJARSCT
ISSN: 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Volume 5, Issue 2, October 2025
Impact Factor: 7.67

# वैदिक धर्मातील कर्मकांड विरोधी चार्वाक

**डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे**
प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, मायणी, ता. खटाव जि. सातारा
gtkhurpe@gmail.com

**सारांश :** वैदिक धर्मातील कर्मकांड हे धार्मिक विधी आणि यज्ञ-यागांच्या माध्यमातून आत्मा, पुनर्जन्म आणि देवतांच्या पूजेचे महत्त्व अधोरेखित करतात. याच्या विरोधात चार्वाक दर्शन हे भौतिकवादी आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित विचारसरणी आहे, ज्याने कर्मकांडांच्या निरर्थकतेचा आग्रह धरला. या संशोधन लेखात चार्वाक दर्शनाच्या वैदिक कर्मकांड विरोधी दृष्टिकोनाचे ऐतिहासिक, तात्विक आणि सामाजिक विश्लेषण केले आहे. यातून असे दिसून येते की चार्वाकने वैदिक परंपरांना आव्हान देऊन भौतिक सुख आणि प्रत्यक्ष ज्ञानावर भर दिला. या अभ्यासाने भारतीय दर्शनातील विविधतेचे महत्त्व अधोरेखित होते. चार्वाक दर्शनाने वैदिक कर्मकांडांच्या निरर्थकतेची टीका करून भौतिकवाद आणि प्रत्यक्षवादाला मजबूत आधार दिला. वैदिक धर्मातील कर्मकांड हे सामाजिक आणि राजकीय नियंत्रणाचे साधन होते, ज्याचा चार्वाकने विरोध करून व्यक्तिस्वातंत्र्याला प्रोत्साहन दिले. ऐतिहासिकदृष्ट्या, चार्वाकच्या विचारांचा प्रभाव बौद्ध आणि जैन धर्मात दिसतो, ज्यात कर्मकांडांना कमी महत्त्व आहे. आधुनिक संदर्भात, चार्वाकचे विचार वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध विचारसरणीशी जुळतात, जसे की अंधश्रद्धा निर्मूलनात आपल्याला दिसतात.

**मुख्य शब्द :** चार्वाक, वैदिक धर्म, कर्मकांड, विरोध, भौतिकवाद, प्रत्यक्षवाद, लोकायत, भारतीय दर्शन

**प्रस्तावना :** भारतीय दर्शन परंपरेत वैदिक धर्म हा प्राचीन आणि मूलभूत आहे, ज्यात कर्मकांडांचे स्थान अग्रगण्य आहे. वेद, उपनिषदे आणि पुराणांमध्ये वर्णित यज्ञ, होम, पूजा इत्यादी कर्मकांड हे आत्म्याच्या शुद्धीकरणासाठी आणि देवतांच्या प्रसन्नतेसाठी आवश्यक मानले जातात. याच्या विरुद्ध, चार्वाक दर्शन (ज्याला लोकायत म्हणूनही ओळखले जाते) हे एक नास्तिकवादी आणि भौतिकवादी शाखा आहे, ज्याने वैदिक कर्मकांडांच्या निरर्थकतेचा आणि फसवणुकीचा आरोप केला. चार्वाकचे संस्थापक बृहस्पती मानले जातात, ज्यांनी 'बार्हस्पत्यसूत्र' नावाचा ग्रंथ रचला. हे दर्शन वैदिक परंपरांना आव्हान देऊन प्रत्यक्ष इंद्रियानुभव (प्रत्यक्ष) ला एकमेव ज्ञानस्रोत मानते. या संशोधनात चार्वाकच्या वैदिक कर्मकांड विरोधी भूमिकेचे परीक्षण करून भारतीय दर्शनातील विरोधाभासांचा अभ्यास करण्यात येत आहे. हा लेख प्राचीन ग्रंथांच्या आधारावर चार्वाकच्या तात्विक योगदानाचे मूल्यमापन करतो.

चार्वाक दर्शनातील अपुरी माहिती उपलब्ध आहे कारण चार्वाकाचे ग्रंथ जाळले गेले होते. विरोधकांनी लावलेले त्यांच्या दर्शनाबद्दलचे विरोधाभासी अर्थ आणि त्यांच्याबद्दलची विरोधी वलये यामुळे चार्वाकांच्या तत्त्वविचारला वेगळे वळण दिले गेले? मानवाने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी कर्ज घेणे ही बाब वाईट नाही. मनुस्मृतीत चार वर्णाकडून अनुक्रमे दरमहा २, ३, ४ व ५ टक्के व्याज तसेच शूद्राकडून सर्वात जास्त व्याज घ्यावे असा अन्यायकारक नियम आहे. याविरुद्ध यज्ञ, दक्षिणा व प्रसंगोपात्त, ब्राह्मणाने इतरांना लुबाडण्याचे अनेक नियम, संदेश आमच्या तथाकथित धर्मग्रंथांमध्ये आहेत. लोकायतिकांच्या मते ईश्वर, कर्मफल आणि देहाव्यतिरिक्त आत्मा ह्यांपैकी काहीच अस्तित्वात नसल्यामुळे कर्मकांडात्मक धर्म पूर्णपणे अनावश्यक ठरतो. त्यांच्या मते वैदिकांचा धर्म म्हणजे धूर्तांचे कट-कारस्थान आणि बळी पडणारे लोक मूर्ख असतात. मानवी जीवन *'सुख-दु:ख'* मिश्रीत आहे हे चार्वाक तत्त्वविचारातही दिसते पण म्हणून वास्तविक जीवनाकडे पाठ फिरवून जपातपाच्या मार्गाला लागून संन्यास घ्यावा हा विचार चार्वाक दर्शनात येत नाही.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 2, October 2025
Impact Factor: 7.67

आज समाजात गोरगरीब माणसाला कर्ज मिळत नाही आणि नौकरदाराच्या पाठीमागे बँका लागल्याचे चित्र दिसते आहे तसेच गोरगरीब जनतेला खाजगी सावकाराकडून अधिक व्याजदर आकारून कर्ज दिले जाते. नाईलाजाने भारी व्याज देऊन बहुजनांना कर्ज घ्यावे लागते आणि ते फेडण्यासाठी आयुष घालवावे लागत. धर्माच्या नावाखाली त्या काळी शुद्रावर अन्याय झालेला होता. *सर्वदर्शनसंग्रहात* म्हटल्याप्रमाणे चार्वाकांच्या मते बहुजनांच्या हितासाठी, त्यांच्या मताचा आश्रय घेऊन लोकांना कर्मकांडांत्मक धर्मातून सोडविणे आवश्यक आहे. बहुजन समाज कर्मकांडात गुंतला तर त्या समाजाची प्रगती होणार नाही हे चार्वकांनी ओळखले होते. चार्वाक तत्त्वविचार हे मानवी जीवनाच्या एकसंघतेसाठी, सुखासाठी, संपूर्ण विकासासाठी आणि त्यांच्या अर्थपूर्ण जगण्यासाठी अत्यंत मौलिक अशी आहेत. सदोष जीवनाला चार्वाक तत्त्वविचार निर्दोष करतात ,चार्वाक तत्त्वविचारात सुखमय जीवन जगण्यातच सर्वांचे भले आहे केवळ भ्रामक कल्पनांना चिटकून राहण्यात कसली आली आहे प्रगती! कसला आला आहे विकास ! असे सांगण्यात आले आहे. मानवी जीवन अर्थपूर्ण होण्यासाठी शहाणपणाने जीवन आचरण करावे तरच जीवन जगण्याला अर्थ राहील अन्यथा मानवी जीवन निरर्थक बनेल!

**संशोधन पद्धती :**

संशोधकाने प्रस्तुत संशोधन लेख लिहिण्यासाठी ग्रंथालयीन पद्धतीचा वापर अधिक प्रमाणात केलेला आहे. ऐतिहासिक पद्धती बरोबरच विश्लेषणात्मक पद्धती आणि अनेक दुय्यम साधनांचाही वापर या संशोधन लेखाच्या अनुषंगाने केलेला आहे. त्याचबरोबर सदरील संशोधन लेखासाठी नियतकालिके, संकेतस्थळावरील माहिती वर्तमानपत्रातील लेख आणि विविध तज्ज्ञांची लेख व मते विचारात घेऊन आजच्या काळात वैदिक धर्मातील कर्मकांड विरोधी चार्वाक याची मांडली केलेली आहे. या संशोधनात द्वितीयक स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. मुख्यतः प्राचीन भारतीय ग्रंथ

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 2, October 2025
Impact Factor: 7.67

जसे की वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण आणि चार्वाक-संबंधित सूत्र (उदा. बार्हस्पत्यसूत्र) यांचा अभ्यास केला. तसेच आधुनिक विद्वानांच्या टीका आणि व्याख्या जसे की देबीप्रसाद चट्टोपाध्याय यांच्या 'लोकायत' आणि राधाकृष्णन यांच्या 'इंडियन फिलॉसॉफी' यांचा संदर्भ घेतला. संशोधन पद्धती ही ऐतिहासिक-तुलनात्मक आहे, ज्यात वैदिक आणि चार्वाक सिद्धांतांची तुलना करून विश्लेषण केले. डेटा संकलनासाठी पुस्तकालय आणि डिजिटल स्रोतांचा वापर करण्यात आला. हे संशोधन गुणात्मक स्वरूपाचे आहे, ज्यात तात्विक चर्चा आणि उदाहरणांचा समावेश आहे.

**संशोधनाची उद्धीष्टे :**

१. वैदिक धर्मातील कर्मकांडांच्या मुख्य वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे

२. चार्वाक दर्शनाच्या मूलभूत सिद्धांतांचे परीक्षण करणे

३. चार्वाकने वैदिक कर्मकांडांना केलेल्या विरोधाच्या कारणांचे विश्लेषण करणे

४. या विरोधाच्या ऐतिहासिक आणि सामाजिक परिणामांचे मूल्यमापन करणे

५. भारतीय दर्शनातील चार्वाकच्या योगदानाचे आधुनिक संदर्भात परीक्षण करणे

**वैदिक धर्मातील कर्मकांड विरोधी चार्वाक याचे विश्लेषण :**

**१. वैदिक धर्मातील कर्मकांडांची रचना :**

वैदिक धर्मात कर्मकांड हे वेदांच्या कर्मकांड भागावर आधारित आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेदात यज्ञ, होम, मंत्रोच्चार इत्यादींचे वर्णन आहे. हे कर्मकांड आत्म्याच्या मुक्तीसाठी आणि देवतांच्या पूजेसाठी आवश्यक मानले जातात. उदाहरणार्थ, अश्वमेध यज्ञ किंवा सोमयाग हे राजकीय आणि सामाजिक शक्ती वाढविण्यासाठी केले जात. वैदिक विचारसरणीनुसार, कर्मकांड हे फलप्राप्तीसाठी साधन आहेत आणि ते पुनर्जन्माच्या चक्रातून मुक्ती देतात.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 2, October 2025
Impact Factor: 7.67

**२. चार्वाक दर्शनाची ओळख :**

चार्वाक हे प्राचीन भारतीय दर्शनातील एकमेव भौतिकवादी शाखा आहे. याचे मुख्य सूत्र 'यावत् जीवेत् सुखं जीवेत्, ऋणं कृत्वा घृतं पिबेत्' (जोपर्यंत जीव आहे, सुखाने जगावे, कर्ज घेऊन घी प्यावे) हे आहे. चार्वाकने चार ज्ञानस्रोत नाकारले आणि फक्त प्रत्यक्ष (इंद्रियानुभव) ला मान्यता दिली. आत्मा, देवता, पुनर्जन्म इत्यादींचा नकार देत ते म्हणतात की मृत्यूनंतर सर्व संपते, म्हणून भौतिक सुखाचा उपभोग घ्यावा.

**३. वैदिक कर्मकांडांविरोधी चार्वाकचा दृष्टिकोन:**

वैदिक कर्मकांडांविरोधी चार्वाकचा दृष्टिकोनामध्ये चार्वाकांनी -

**अ. तात्विक विरोध :**

कर्मकांड आत्मा आणि परलोक यावर आधारित आहेत, ज्याला चार्वाक नाकारतो. त्यांचे प्रसिद्ध सूत्र आहे: "भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः?" ( जळलेल्या शरीराचा पुनरागमन कसा?) यज्ञांनी पाऊस पडणे किंवा फलप्राप्ती होणे हे अवैज्ञानिक आहे. चार्वाक म्हणतो, "नैसर्गिक कारणांनी पाऊस पडतो, यज्ञांनी नाही.

**ब. आर्थिक शोषण :**

कर्मकांडांच्या नावाखाली ब्राह्मण आणि पुरोहित दान, दक्षिणा आणि संपत्ती गोळा करतात, जे सामान्य जनतेचे शोषण आहे. चार्वाकने यज्ञांना 'पंडितांची उपजीविका' आणि 'फसवणूक' म्हटले.

**क. सामाजिक टीका :**

कर्मकांडांनी वर्णव्यवस्थेला बळकटी दिली, ज्यामुळे सामाजिक असमानता वाढली. चार्वाकने वर्णव्यवस्थेला थेट आव्हान दिले नाही, परंतु त्यांच्या भौतिकवादी दृष्टिकोनातून समानतेचा विचार दिसतो.

कर्मकांड हे सामाजिक नियंत्रणाचे साधन आहे, जे तर्क आणि स्वातंत्र्याला बाधा आणते.

**ड. वैज्ञानिक दृष्टिकोन :**

चार्वाकने प्रत्यक्ष अनुभवावर आधारित तर्कशुद्ध विचारांना प्रोत्साहन दिले, जे वैदिक कर्मकांडांच्या अंधश्रद्धेला नाकारत होते.

**४. ऐतिहासिक आणि सामाजिक परिणाम :**

**ऐतिहासिक प्रभाव :** चार्वाकाच्या विचारांचा प्रभाव बौद्ध आणि जैन धर्मांवर दिसतो, ज्यांनी कर्मकांडांना कमी महत्त्व दिले. बौद्ध ग्रंथांत चार्वाकच्या विचारांचा उल्लेख 'नास्तिक' म्हणून होतो, परंतु त्यांचे तर्कशुद्ध दृष्टिकोन स्वीकारले गेले.

**सामाजिक प्रभाव :** चार्वाकने कर्मकांडांच्या शोषणाला आव्हान देऊन व्यक्तिस्वातंत्र्य आणि तर्कशुद्धतेचा पुरस्कार केला. यामुळे वैदिक धर्माच्या अतिरेकी प्रथांना सुधारण्यास मदत झाली.

**आधुनिक संदर्भ :** चार्वाकचे विचार आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनाशी संनादतात. भारतातील अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ (उदा., डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे कार्य) चार्वाकच्या तर्कशुद्धतेशी जोडली जाऊ शकते.

**५. चार्वाकांची वेदातील अलौकिक बाबींवर टिका :**

तर्क व प्रत्यक्ष प्रमाणांच्या आधारे धर्मशास्त्रांची - वेदांची कठोर चिकित्सा चार्वाकांनी केलीली आहे. लौकिक अनुमान व अलौकिक अनुमान असे अनुमानाचे दोन भाग करून प्रत्यक्ष प्रमाण नसलेले अलौकिक अनुमान चार्वाकांनी नाकारले आहे. लौकिक अनुमानाचेही व्यावहारिक व तात्त्विक असे दोन भाग करून तात्त्विक अनुमानाच्या मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. देहाहून वेगळा असा आत्मा नसतो, पूर्वजन्म-पूनर्जन्म, स्वर्ग-नरक, पाप-पुण्य, ईश्वर, मौक्ष इत्यादी अलौकिक बाबींचे अनुमान चार्वाक तत्त्वविचारात नाकारले आहे. वरील बाबी नाकारल्यामुळे वेदांनी-धर्मशास्त्रांनी उभा केलेला अलौकिकाचा सारा डोलारा अर्थहीन होतो. अनुमानामुळेही पूर्ण

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 2, October 2025
Impact Factor: 7.67

सत्य कळत नाही कारण अनुमानामुळे मिळणारे ज्ञान हे व्यवहार उपयोगी असते मात्र ते पूर्ण सत्याचा अर्थ बोध करीत नाही. त्यामुळे अनुमानाच्या मर्यादा लक्षात घेतल्या पाहिजेत. मुनी, धर्मसंस्थापक, प्रेषित इत्यादींनी केलेली अनुमाने ही पूर्ण सत्य आहेत असे मानल्यामुळे आपले खऱ्या सत्याचे ज्ञान अपुरेच राहते. धर्मशास्त्रे सर्वश्रेष्ठ व स्वयंभू मानल्यामुळे चार्वाक तत्त्वविचारानुसार त्याच्यात खोटेपणा, आत्मविसंगती आणि पुनरुक्ती असे दोष त्याच्यात राहतात असे नमूद केले आहे.

**६. चार्वाकांनी धर्माची संकल्पना नाकारली :**

वैदिकांनी धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यापैकी मोक्ष हा परमपुरूषार्थ सर्वश्रेष्ठ मानला आहे. जन्म-मरणाच्या फेऱ्यातून आणि दू:खातून सुटका असे मोक्षाचे वर्णन केले जाते. मोक्ष नाकारून '*पारतंत्र्य म्हणजे बंध आणि स्वतंत्र्य म्हणजेच मोक्ष*' ही संकल्पना मांडली. स्वातंत्र्यासाठी जगभर होणारी आंदोलने पाहिली, आर्थिक सामाजिक व राजकिय जोखडातून मुक्त होण्यासाठी चाललेली माणसांची धडपड पाहिली तर चार्वाकांनी स्वतंत्र्यालाच सर्वोत्तम पुरूषार्थ का मानले हे लक्षात येईल. मृत्यूनंतरचे पारलोकिक जीवन नाकारताना वर्तमानातील जीवनावरचे प्रेम, कर्मसिद्धांत नाकारताना वर्तमानाचा गौरव आणि ईश्वर नाकारताना स्वभाववाद अशी विधायक बाजू चार्वाक तत्त्वविचारात दिसून येते. चार्वाक तत्त्वविचारात केवळ अर्थ व काम हे दोनच पुरुषार्थ मानले जातात. पुण्यकृत्य परलोकात सुख देणारे - पापकृत्य परलोकात दु:ख देणारे ही धर्माची संकल्पना चार्वकांनी नाकारली. यारून चार्वाकांची धर्मटिका म्हणजे समाज धारणे विषयीचे गंभीर चिंतनच होते हे स्पष्ट होते.

**७. चावाकांचे पुरुषार्थ व जड - चैतन्यावर भाष्य :**

चार्वाक दर्शनाच्या प्रमाणशास्त्रावर त्याचे ज्ञानशास्त्र अवलंबून आहे. त्याचे प्रमाणशास्त्र हे अन्विक्षा आणि प्रत्यक्ष या प्रमाणावर उभे राहिलेले आहे. चार्वाकाचे प्रमाणशास्त्र हे पंच

ज्ञानेंद्रियाला जे प्रतीत होईल - अनुभवता येईल तेच सत्य बाकी सर्व असत्य. आकाश ही अनंत पोकळी असून ती इंद्रियाद्वारे प्रतीत होत नाही म्हणून चार्वाक पृथ्वी, आप, तेज आणि वायू या चार महाभूताद्वारे किंवा मूलद्रव्याद्वारे विश्वाची निर्मिती झाली आहे असे मानतात. इंद्रियांना ही चारही मूलद्रव्य प्रतीत होणारी असून क्रियाशील आणि गुणी आहेत. या चार मूलद्रव्यांच्या संयोगातून चैतन्य हा गुण निर्माण होतो त्यामुळे चार्वाकाचा भौतिकवाद हा जडाच्या संयोगातूनच चैतन्य निर्मिती होते आणि या जडाच्या विरोगातून चैतन्य संपुष्टात येते. चार्वाकाच्या मते जडातच चैतन्य निर्मितीचे शक्ती सामर्थ्य आहे. जीवन अर्थपूर्ण आणि निर्देशपणे जगण्यासाठी अस्तिकतेच्या परस्परविरोधी असलेल्या नास्तिक दर्शनाचा अखिल समाज पर्याय म्हणून स्वीकार करत आहे. भारतासह जगातील समाजजीवन दिशाहीन होत आहे आणि वास्तवातील मूळ प्रश्नच भरकटच चाललेले आहेत.

**निष्कर्ष :**

चार्वाक दर्शन हे वैदिक धर्मातील कर्मकांडांच्या विरोधात एक क्रांतिकारी आणि तर्कशुद्ध विचारसरणी आहे. त्याने कर्मकांडांच्या निरर्थकता, आर्थिक शोषण आणि सामाजिक नियंत्रणाच्या स्वरूपाला उघड करून भौतिकवाद, प्रत्यक्षवाद आणि सुखवादाला प्रोत्साहन दिले. प्रत्यक्षात नसणाऱ्या बाबींना मानून तसेच रुढीपरंपरा प्रथा चालत आलेल्या त्यांना मान्यता देऊन शासन सत्ता चालवली जात असल्याने ज्वलंत प्रश्नही अधिकच गहन होत चालले आहेत.

ऐतिहासिकदृष्ट्या, चार्वाकच्या विचारांनी बौद्ध आणि जैन धर्मांना प्रभावित केले आणि सामाजिक सुधारणांचा पाया घातला. आधुनिक काळात, चार्वाकचे विचार अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाशी जोडले जाऊ शकतात. मात्र, त्यांच्या ग्रंथांचा अभाव आणि वैदिक परंपरेच्या प्रबळतेमुळे त्यांचे योगदान मर्यादित राहिले. तरीही, भारतीय दर्शनातील विविधतेचा आणि

तर्कशुद्धतेचा पुरस्कार करणारा चार्वाक हा एक महत्त्वाचा दुवा आहे. भविष्यात पुरातत्वीय आणि साहित्यिक संशोधनाद्वारे चार्वाकच्या विचारांचा अधिक सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची :**

१. चट्टोपाध्याय, देबीप्रसाद, (१९५९), लोकायतः ए स्टडी इन एन्शंट इंडियन मटेरियालिझम. पीपल्स पब्लिशिंग हाउस, दिल्ली

२. राधाकृष्णन, एस. (१९२३), इंडियन फिलॉसॉफी (खंड १), ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन

३. दासगुप्ता, सुरेंद्रनाथ, (१९२२), ए हिस्टरी ऑफ इंडियन फिलॉसॉफी (खंड १). केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस

४. महाभारत (शांतिपर्व), (संस्कृत मूल आणि हिंदी अनुवाद), गोरखपूर, गीता प्रेस

५. हिरियाणा, एम. (१९३२), आउटलाइन्स ऑफ इंडियन फिलॉसॉफी. जॉर्ज ॲलन आणि अनविन, लंडन

६. वार्डर, ए.के. (१९७०), इंडियन बौद्धिझम, दिल्ली, मोतीलाल बनारसीदास

७. सदाशिव, आठवले, *चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान*, वाई, प्रज्ञा पाठशाळा, १९८०

८. कुमठेकर, उदय, वेध चार्वाकाचा, नांदेड, अभय प्रकाशन, २००१

९. गाडगीळ, स.रा . *लोकायत*, मुंबई, लोकवाङ्मय गृह, १९७४

१०. गोखले, प्रदीप, *तत्त्वचिंतक चार्वाक*, पुणे, मनोविकास प्रकाशन, २०१३